# MARATHI (S.L) (For Children with Special Needs)
# Model Question Paper

**STD : XII    SUB : MARATHI LANG II    PRINTED PAGES : 05    MARKS : 80    TIME :2½ HOURS**

सूचना ः १  शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत
२  उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात

प्र.१अ ः खाली पाठयपुस्तकातील पाठांतील काही उद्‌गार दिले आहेत व त्यापुढे पर्याय दिले आहेत योग्य ते पर्याय निवडून लिहा.

१."आम्ही सारे भाऊ आहोत तुझे. भाऊबिजेची ओवाळणी म्हणून तुला हे मोती देणार होत!" **02**

लेखक ः पु.ल.देशपांडे / वि.स.खांडेकर / आचार्य अत्रे
पाठ ः मोत्यांचे पीक / मोहर / न पाहिलेले गांधिजी

२."तू बाबांच्याबद्दल पुनः कधी आईला विचारू नकोस हो! ती की नाही लागलीच रडायला लागते!" **02**

लेखक ः पु.ल.देशपांडे / वि.स.खांडेकर / दिवाकर
पाठ ः मोत्यांचे पीक / पंत मेले राव चढले / न पाहिलेले गांधिजी

३. "चुकून माकड कराल,नि सारी पंचाइत होईल! कारण मी आता म्याँव, म्याँव करायला शिकलो आहे." **02**

लेखक ः पु.ल.देशपांडे / रमेश मंत्री / आचार्य अत्रे
पाठ ः मांजर व्हा / मोहर / न पाहिलेले गांधिजी

प्र.१ ब ः खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. **03**

१.जगात आढळणा-या माणसांचे तीन प्रकार कोणते ?
२.काझिरंगाच्या जंगल अधिका-याचे नाव काय होते ?
३.संजू कधी रक्तदान करायचा ?

प्र.१ क.खालील उद्‌गार कुणी कुणाल उद्देशून म्हटले ते लिहा. **03**

१. "साधा चारा कशाला हवा ? हा मोत्यांचा चारा घे !"
२. "हां, हां, माकड व्हायचं आहे.बसा."
३. "तुम्हीच खा. मुलांनीच खाण्यात गंमत असते."

प्र.१ ड.खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. **04**

१.म्हैसूरच्या झू मधला गेंडा कसा होता ?
२.भोवतीच्या पोषक वातावरणाविषयी लेखक काय सांगतात ?
३.खोलीत दोघे तावातावाने का भांडत होते ?

प्र.२ अ : खाली पाठयपुस्तकातील कवितांतील काही ओळी दिल्या आहेत व त्यापुढे पर्याय दिले आहेत योग्य ते पर्याय निवडून लिहा.

१.रविशशि अग्नि नेणती ज्या रूपा।
स्वप्रकाशरूपा नेणें वेद।। **02**

कवी : संत नामदेव / संत एकनाथ / संत नामदेव

कविता : गुरूमहिमा / संतकृपा जाली / कांदामुळा भाजी

२.विवेकाची ठरेल ओल। ऐसे बोलावे कीं बोल।
आपुल्या मतें उगाच चिखल। कालवूं नको रे।। **02**

कवी : संत सोहिरोबानाथ / संत नामदेव / संत एकनाथ

कविता : संतकृपा जाली / कांदामुळा भाजी / हरीभजनाविण काळ

३.देखणे ते स्कंध ज्यां ये
सूळ नेता स्वेच्छया ।
लाभला आदेश प्राणा
निश्चये पाळावया ।। **02**

कवी : बा.भ.बोरकर / नरेंद्र बोडके / ग.दि.माडगूळकर

कविता : माये ग माये / देखणे ते चेहरे / या नभाने

प्र.२ ब : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. **03**

१.कोणत्या कारणाने गाय हुंबरते ?

२.किंकर म्हणजे कोण ?

३.एकाच आचमनात समुद्राला कुणी प्राशन केले होते ?

प्र.२ क.खालील दिलेल्या काव्यांशाच्या योग्य जोडया लावा. **04**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १.विवेकाची ठरेल ओल | कोंडीती सा-या नभा |
| २.याच मंत्राने मृतांचे | आस का धरावी |
| ३.तेच डोळे देखणे | ऐसे बोलावे कीं बोल |
| ४.आम्ही चार किरणांची | राष्ट्र सारे जागले |
| | शांतिवादी झुंजले |
| | ध्यानि आणुनि पुरतें उमज |

प्र.२ड. खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा. **03**

१.___ न देखता गायी हुंबरती ।झाले मजप्रती तैसे आता।। ( सस्य, वत्स, मत्स्य )

२. निर्मिला हा मंत्र ज्यांनी आचरीला____ ( पिंजुनी, वंदुनी, झुंजुनी)

३. .त्यो ____ माज्यासाठी हाय सोन्याचा गोळा. ( वासरू, आसरू, अश्रू)

प्र ३ (अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. 04

१. **<u>तिला</u>** स्पेनिश **<u>व</u>** इंग्रजी अशा दोन भाषा येतात.

२. **<u>माधव</u>** त्या चित्राने फार सुखावला व झपझप चालू **<u>लागला.</u>**

प्र ३ (आ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा. 03

अ. खोटारडा आ. उदार इ. भोंदू

प्र ३ (इ) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. 03

अ. मृत्यू आ. लहान इ. संभव

प्र ३ (ई) खालील शब्दांची विशेषणे लिहा. 03

अ. गारवा आ. हुशारी इ. गरज

प्र ३ (उ) खालील शब्दांचे वचन बदला. 03

अ. पुस्तक आ. राजधानी इ. मासा

प्र ३ (ऊ) खालील शब्दांचे लिंग बदला. 03

अ. विदुषी आ. शिक्षक उ. मोर

प्र ४. 'प' गटातील वाक्प्रचार आणि 'फ' गटातील वाक्प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोडया जुळवून लिहा. 05

| <u>'प'</u> | <u>'फ'</u> |
|---|---|
| अ. भांबावून जाणे | प्रभाव टाकणे |
| आ. बार टाकणे | गोंधळून जाणे |
| इ. छाप पाडणे | गोळी घालणे |
| ई. घायकुतीला येणे | जबाबदारी स्वीकारणे |
| उ. पोटात शिरणे | अस्वस्थ होणे |
| | खुलून दिसणे |
| | वश करून घेणे |

प्र.५ अ. खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा. 05

तारूण्य म्हणजे जीवनाच्या वृक्षाला आलेला सुवासिक मोहर. हा एकदाच येतो. पण जेव्हां येतो तेव्हा नवचैत्यन्याची पालवी फुटते. रस भावनांची फुले फुलून येतात, उन्मादाचा गंध दरवळायला लागतो. कित्येक स्वप्नांचे कांचनमृग दृष्टीसमोर उभे राहतात. अशावेळी सुखे तर हवीशी वाटतात मात्र गेलेल्या तारूण्याची केविलवाणी साक्ष देत उभ्या असतात. खरे तर वार्धक्यही यौवनाइतकेच नैसर्गिक नाही का? ते केव्हातरी येणारच असते. त्यातही जीवनाचे काही सौंदर्य असते. पिकलेल्या फळाला जशी एक रूची असते तसे पिकलेले जीवनही रूचिर आणि प्रसन्न असायला हरकत नाही. तृप्ती आणि विरक्ती यांचे छानदार मिश्रण म्हणजे म्हातारपण असे म्हणता येईल. म्हातारा होईपर्यंत जगणे हे एक भाग्याचे लक्षण मानले जाते. पण माणसे वार्धक्याला घाबरतात. ते येऊ लागले की, त्यांची वाट अडविण्याचा प्रयत्न करतात.

पृष्ठ क्रमांक ३९९

विद्याभारती स्पर्धा परिक्षा

**प्रश्न** ः १.तारूण्यात सुखाबद्दल कोणत्या भावना निर्माण होतात ? (०१)
२.तारूण्याला लेखकाने कशाची उपमा दिली आहे ? (०१)
३.वार्धक्याला अडवण्याचा प्रयत्न का केला जातो ? (०१)
४.म्हातारपण हे कशाचे मिश्रण असे लेखक म्हणतात ? **(०१)**
५.उता-याला योग्य शीर्षक लिहा . **(०१)**

प्र.५ ब. खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा. **05**

अमेरिकेत ज्न्मलेल्या, वाढलेल्या मराठी मुलांचे काय होणार आहे? हयुस्टनमधल्या एका मराठी मुलीचं अमेरिकन माणसाशी लग्न ठरलं होतं.दुस-या एका मुलीने कॉम्पुटरच्या सहाय्याने अमेरिकन तरूणाशी लग्न जमवलं होतं.त्यांचं पुढे काय होणार? त्यांना मुले होतील, त्यांचे भवितव्य काय? गणेश चतुर्थीचा अर्थ त्यांना काय कळणार? डिस्नेलँडमध्ये आम्ही जंगलाचा फेरफटका मारत असताना आम्हाला गणपतीची मोठी दगडी मूर्ती दिसली होती.आमचे हात जोडले गेले.मात्र आमच्या बरोबरचे बाकीचे प्रवासी मूर्ती पाहून 'दॅटस् - एलिफंट गॉड'...... असे म्हणत होते.तिथल्या मराठी माणसांची नवी पिढी व त्यापुढची पिढी गणपतीची मूर्ती पाहून 'दॅटस् एलिफंट गॉड'...... म्हणतील आणि पुढे जातील.

१.गणपतीची मूर्ती पाहून अमेरिकन काय म्हणतात?
१.दॅटस् मंकी मास्क २. दॅटस् - एलिफंट गॉड ३.दॅटस् स्लिपिंग बुद्धा ४.यांपैकी नाही

२.अमेरिकेतील नवीन मराठी पिढीतील मुले कोणाशी लग्न करतात ?
१.मराठी तरूण - तरूणींशी २. अमेरिकन तरूण - तरूणींशी
३.नौदलातील व्यक्तिशी ४.यांपैकी नाही

३.डिस्नेलैंडमध्ये लेखकाला आपल्या परिचियाचे काय पहायला मिळाले ?
१.जंगली प्राणी २. गणपतीची मूर्ती ३.हत्तीची मूर्ती ४.चायनीज जेवण

४.अमेरिकेतील मराठी मुलांविषयी लेखकाला कोणती चिंता वाटते ?
१.त्यांचे भवितव्य काय ? २. ती मुले आनंदात जगतात
३.त्यांचा आत्मविश्वास मोठा आहे ४.त्यांना भारत देश आवडत नाही

५. 'हात जोडले गेले' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.
१.सलाम २. नमस्कार ३.पावन ४.पवित्र

प्र. ६. 'विकास उच्च माध्यमिक विद्यालय', लोलये आयोजित बक्षिस वितरण समारंभाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. **05**

प्र. ७. रामदास उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षकदिन साजरा होणार आहे.त्या कार्यक्रमासाठी आभार प्रदर्शनाचे भाषण लिहा.त्यासाठी खालील मुद्यांचा आधार घ्या. **04**

अ.कार्यक्रमाचा उल्लेख
ब.संस्थेच्या वतीने आभार.
क.मान्यवरांचे आभार.
ड.उपस्थितांचे आभार
इ.सहकार्य करणा-यांचे आभार

प्र. ८.खालील संवाद आई व मुलीमधला आहे.तो तुम्ही तुमच्या शब्दात पूर्ण करा. **05**

आई : माले, उठ लवकर.दहा वाजले.

माला : अगं आज रविवार.निदान ______________________________

आई : लवकर निजे लवकर उठे ......

माला : त्यास ______________________________.कळतं मला.

आई : पण माले, वळत मात्र नाही हं!

माला : ये आई,______________________________

आई : मी? मग कामं कोण करणार?

माला : ______________________________.ते करतील.

आई : भल्या पहाटेच गेले ते शेतावर.

माला : अग, पण आज तर सुट्टी.

आई : शेतक-याला कुठली आली आहे सुट्टी?

माला: तुझ्च बरोबर ग. ______________________________

*******